**राज्यस्तरीय कार्यक्रम सल्लागार समिती आणि जिल्हा, तालुका, केंद्रस्तरीय गुणवत्ता कक्ष यांची पुनर्रचना करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः २०२३/प्र.क्र३०/एसडी-६**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई ४००० ३२
दिनांक: १० मे, २०२३

**वाचा :-**

१) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक : पोटीसी १०९७/(३५१/९७)माशि-४ ,दिनांक: २० जानेवारी, १९९८.
२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन पूरकपत्र क्र. पीटीसी १०९७/(३५१/९७)माशि-४ दिनांक: ९जुलै, १९९९.
३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन परिपत्रक क्रमांक : शैवि-२०१४/(८९/१४) / एस.डी.-६, दि. २४ जुलै, २०१४.
४) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक : शप्रियो २२१४/प्र.क्र.५३/२०४ /प्रशिक्षण, दिनांक: २१ नोव्हेंबर, २०१४.
५) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक: डायट ४५१६ (४०/१६)/प्रशिक्षण, दिनांक: १७ ऑक्टोबर, २०१६.
६) भारत सरकार मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्रं F. No.२-१६/२०१७ EE ३Dt.५th April, २०१८.
७) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१७९/एस.डी.-६ दिनांक: २७ ऑक्टोबर, २०२१.

**प्रस्तावना:-**

केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत प्रत्येक जिल्हयात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. या संस्थांमार्फत प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी प्रभावीपणे होण्याच्या दृष्टीने कार्यक्रम सल्लागार समिती स्थापन करण्याचा निर्णय संदर्भाधीन क्रं. १ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला होता. संदर्भ क्र.२ नुसार जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांच्या कार्यक्रमांचे नियोजन व अंमलबजावणी प्रभावीपणे होण्याकरिता सल्लागार समितीवर विभागीय शिक्षण उपसंचालक यांची सहअध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ ची अंमलबजावणी, तसेच सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान इत्यादीच्या माध्यमातून शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे लक्ष्य साध्य करण्यासाठी केंद्र शासन, राज्य शासन व स्थानिक प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने गुणवत्तेत वाढ करण्यासाठी विविध उपाययोजना

करण्यात येत होत्या. त्याचाच एक भाग म्हणून प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र, कार्यक्रम शासन निर्णय दिनांक २२ जून, २०१५ आणि प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र, माध्यमिक स्तर शासन निर्णय दिनांक १६ सप्टेंबर, २०१६ कार्यान्वित करण्यात आला आहे. त्यानुषंगाने शैक्षणिक गुणवत्ता वृद्धीसाठी विविध प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. संदर्भ क्र.५ नुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र (विद्या प्राधिकरण)या संस्थेची पुनर्रचना करण्यात आली आहे.

संदर्भ क्रं. ६ नुसार कार्यक्रम सल्लागार समितीची (PAC) राज्य व जिल्हास्तरावर पुनर्रचना करण्याबाबत सूचित केले आहे. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत राज्यातील प्रत्येक मूल प्रगत होण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आलेले आहे. राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण ( NAS), राज्यस्तरीय अध्ययन संपादणूक सर्वेक्षण (SLAS) व अध्ययन स्तर निश्चिती या सर्वेक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे कार्यक्रम सुरु आहेत. शैक्षणिक वर्षे सन २०१८-१९ पासून समग्र शिक्षा अभियान अंतर्गत पूर्व प्राथमिक, प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक स्तरावरील संपादणूक पातळी स्तर निश्चित करण्यात येते. राज्यातील प्रत्येक मूल १०० टक्के शिकण्यासाठी शाळास्तरापर्यंत शिक्षणाच्या गुणवत्तेचा दर्जा उंचवण्यासाठी मार्गदर्शन व समुपदेशन करणे तसेच, शासनाच्या शैक्षणिक धोरणानूसार गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने धोरणात्मक बदल घडवून आणणे आवश्यक झाले आहे. प्रशासकीय व शैक्षणिक कामकाजाची सांगड घालण्यासाठी कार्यक्रम सल्लागार समितीची निर्मिती केली गेली.

संदर्भ क्रं. ७ नुसार जिल्हा गुणवत्ता कक्ष व्यपगत करण्यात आले होते. तथापि संदर्भ क्रं. ६ नुसार कार्यक्रम सल्लागार समितीची (PAC) राज्य व जिल्हास्तरावर पुनर्रचना करण्याबाबत सूचित करण्यात आले असल्याने राज्य, जिल्हा व तालुकास्तरापर्यंत सशक्त शैक्षणिक सक्षमीकरण व्यवस्था करण्याच्या दृष्टीने राज्यस्तरावर कार्यक्रम सल्लागार समितीची स्थापना करण्याची आणि जिल्हा, तालुका व केंद्र या स्तरावरील गुणवत्ता कक्ष यांची पुनर्रचना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासननिर्णय :-**

भारतीय संविधानाच्या कलम २१ अ अंतर्गत वय वर्षे ६ ते १४ वयोगटातील बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण उपलब्ध करण्याची तरतूद केलेली असून, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ अंतर्गत राज्यातील शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता वाढविण्यासाठी शासनाने शिक्षकांचे दर्जेदार प्रशिक्षण व विविध नाविन्यपूर्ण योजनाची प्रभावीपणे अंमलबजावणीसाठी नवीन प्रशिक्षण धोरण दि. २९ जानेवारी, २०१४ च्या शासन निर्णयान्वये जाहीर केले आहे.

२. शैक्षणिक गुणवत्तेचा दर्जा व त्याचे सार्वत्रिकीकरण सुनिश्चित करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेसह सर्व विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयात शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन व नाविन्यपूर्ण उपक्रम कक्ष स्थापन करण्याबाबत शासन निर्णय दि. २४ जुलै,२०१४ व शासन निर्णय दि. २१ नोव्हेंबर,२०१४ निर्गमित करण्यात आले आहेत.

३. राज्यस्तर ते तालुकास्तरापर्यंत शैक्षणिक कामकाजात सुसूत्रता येण्यासाठी व प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी प्रभावीपणे होण्याच्या दृष्टीने शासन निर्णय क्रमांक १ व २ अनुक्रमे दि.२० जानेवारी,१९९८ व दि.९ जुलै,१९९९ हे दोन्ही शासन निर्णय अधिक्रमित करून संदर्भ क्र. ६ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यस्तरीय कार्यक्रम सल्लागार समितीची (State Programme Adivisory Committee-SPAC) संरचना व जबाबदारी पुढीलप्रमाणे कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच, संदर्भ क्र. ३ व ४ च्या शासन निर्णयामध्ये नमूद जिल्हा गुणवत्ता कक्षाची पुनर्रचना करणे आणि तालुका व केंद्रस्तरीय गुणवत्ता कक्षाची रचना निश्चित करण्याबाबतचा निर्णय घेण्यात येत आहे.

**राज्यस्तरीय कार्यक्रम सल्लागार समिती (State Programme Advisory Committee-SPAC)**

| अ.क्र. | समिती सदस्य | पद |
|---|---|---|
| १. | आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे | अध्यक्ष |
| २ | राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई | निमंत्रित सदस्य |
| ३ | शिक्षण संचालक (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, पुणे | सदस्य |
| ४ | शिक्षण संचालक (माध्य व उच्च माध्य.) , शिक्षण संचालनालय, पुणे | सदस्य |
| ५ | संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ (बालभारती), पुणे | सदस्य |
| ६ | शिक्षण संचालक (योजना) शिक्षण संचालनालय, पुणे | सदस्य |
| ७ | उपसंचालक/ प्राचार्य/ शिक्षणाधिकारी<br>( शासनाच्या मान्यतेने ५ सदस्य घेणे .) | सदस्य |
| ८ | स्वयंसेवी संस्थेचा प्रतिनिधी | सदस्य |
| ९ | संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे | सदस्य सचिव |

**राज्यस्तरीय कार्यक्रम सल्लागार समितीच्या (State Programme Advisory Committee SPAC) जबाबदाऱ्या व कार्ये :-**

**अ) धोरण व अंमलबजावणी:-**

१) राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांच्या उपक्रम,कार्यक्रम अंमलबजावणीचे सनियंत्रण करणे.

२) यंत्रणेतील सर्व घटकांच्या सक्षमीकरणासाठी मार्गदर्शन करणे.

३) क्षेत्रीय अधिकारी, शिक्षक ,शाळा यांचेसाठी प्रशिक्षणाच्या गरजा व निकष निश्चित करणे.

४) राज्यस्तरीय विविध कार्यक्रमांचा आढावा घेऊन त्याची परिणामकारकता तपासणे आणि भविष्यकालीन उपक्रमाच्या विकासासाठी पाठपुरावा करणे.

५) जिल्हास्तरीय गुणवत्ता कक्षाच्या बैठकीबाबत वेळोवेळी दिशानिर्देश देणे व अनुधावन करणे .

६) नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP २०२०) मधील शिफारशीच्या अनुषंगाने प्राधान्याने करावे लागणारे बदल व अंमलबजावणी प्रक्रिया यांचे सनियंत्रण करणे.

**ब) माहितीचे विश्लेषण करून निर्णय घेणे.**

१. जिल्हास्तरीय माहितीवरुन अध्ययन निष्पत्तीचे अनुधावन करणे व भविष्यकालीन योजनासाठी /विकासासाठी पाठपुरावा करणे.

२. अध्ययन पातळीनुसार बेंचमार्क निश्चित करणे.

**क) उत्कृष्ट कार्याचे सामाईकीकरण करणे.**

१. राज्यातील विविध जिल्हयांमध्ये राबविलेल्या उत्कृष्ट कार्याचे राज्यस्तरावर सामाईकीकरण करणे.

२. दिक्षा (DIKSHA) ॲपवर उत्कृष्ट व्हिडीओची निवड आणि अपलोड करणे.

३. शिक्षक व अधिकारी यांच्या उत्कृष्ट कामगिरीचे संकलन करून एकत्रीकरण करणे आणि राज्य आणि केंद्र शासनास पाठविण्याची शिफारस करणे.

४. जिल्ह्यामध्ये चालू असलेल्या उत्कृष्ट उपक्रमांना राज्यस्तरावरून प्रोत्साहन देणे.

**जिल्हास्तरीय गुणवत्ता कक्ष ( District Quality Cell ) :**

| अ.क्र. | समिती सदस्य | पद |
|---|---|---|
| १ | मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| २. | उपायुक्त,म.न.पा. | सदस्य |
| ३ | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना विभाग, जि.प. | निमंत्रित सदस्य |
| ४ | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) | सदस्य |
| ५ | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) | सदस्य |
| ६ | शिक्षणाधिकारी (योजना) | सदस्य |
| ७ | वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था | सदस्य |
| ८ | जिल्हा क्रीडा अधिकारी | निमंत्रित सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ९ | समाज कल्याण अधिकारी, जि.प. | निमंत्रित सदस्य |
| १० | प्रशासन अधिकारी, म.न.पा. / न.पा. (प्रत्येकी एक सदस्य) | सदस्य |
| ११ | गटशिक्षणाधिकारी | सदस्य |
| १२ | विस्तार अधिकारी (आदिवासी विभाग) | निमंत्रित सदस्य |
| १३ | विस्तार अधिकारी (शिक्षण विभाग) | निमंत्रित सदस्य |
| १४ | केंद्र प्रमुख | सदस्य (३) - **प्रत्येक १ वर्षानंतर वेगवेगळ्या तालुक्यातील नवीन सदस्य घेणे.** |
| १५ | मुख्याध्यापक (प्राथ./माध्य./उच्च् माध्य.) | सदस्य (३)-**प्रत्येक १ वर्षानंतर वेगवेगळ्या तालुक्यातील नवीन सदस्य घेणे.** |
| १६ | प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था | सदस्य सचिव |

**मुंबई शहर व मुंबई उपनगर या दोन जिल्ह्यांची संरचना वेगळी असल्यामुळे जिल्हास्तरीय गुणवत्ता कक्षाची पुनर्रचना पुढीलप्रमाणे करण्यात येत आहे.**

| **अ.क्र.** | **समिती सदस्य** | **पद** |
|---|---|---|
| १ | आयुक्त, महानगरपालिका | अध्यक्ष |
| २ | उपायुक्त (शिक्षण), महानगरपालिका | सह अध्यक्ष |
| ३ | विभागीय शिक्षण उपसंचालक | सदस्य |
| ४ | वरिष्ठ अधिव्याख्याता, प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई | सदस्य |
| ५ | शिक्षण निरीक्षक (उत्तर, दक्षिण, पश्चिम) | सदस्य |
| ६ | शिक्षणाधिकारी (मनपा) | सदस्य |
| ७ | शिक्षण उपनिरीक्षक | सदस्य |
| ८ | सहा. शिक्षण उपनिरीक्षक | सदस्य |
| ९ | सहा. कार्यक्रम अधिकारी | सदस्य |
| १० | अधिक्षक, मनपा / नपा (पूर्व, पश्चिम, शहर) | सदस्य |
| ११ | प्रशासकीय अधिकारी (शाळा) | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| १२ | मुख्याध्यापक (प्राथ./माध्य./उच्च् माध्य.) | सदस्य (३) - **प्रत्येक १ वर्षानंतर वेगवेगळ्या तालुक्यातील नवीन सदस्य घेणे.** |
| १३ | प्राचार्य ,प्रादेशिक विद्या प्राधिकरण,मुंबई / जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था | सदस्य सचिव |

**जिल्हास्तरीय गुणवत्ता कक्षाच्या ( District Quality Cell ) जबाबदाऱ्या व कार्ये :-**

**अ) मार्गदर्शन व सहकार्य:-**

१) जिल्हयातील पर्यवेक्षकीय यंत्रेणेला दिशा देऊन जिल्हास्तरीय गुणवत्ता वाढविण्यासाठी निश्चित आराखडा तयार करणे तसेच जिल्हयातील शैक्षणिक समस्यांची चर्चा करुन त्यावर उपाययोजना सुचविणे.

२) जि.प. शिक्षण विभाग,म.न.पा. आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांचे वार्षिक कार्यअहवाल व अंदाजपत्रकात शिफारसी सुचविणे.

३) जिल्हयातील क्षेत्रीय अधिकारी व केंद्रप्रमुख, विषय साधन व्यक्ती यांच्यासाठी गरजेनुसार त्यांच्या सक्षमीकरणासाठी उद्बोधन/बैठक/ प्रशिक्षणाचे नियोजन करणे.

४) जिल्हयातील विद्यार्थ्यांच्या सैक्षणिक गरजेनुसार गुणवत्तावाढीसाठी विविध उपक्रमांचे नियोजन करणे.

५) जिल्हास्तरीय गुणवत्ता कक्षाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाचे अंमलबजावणीबाबत अनुधावन व पुनर्विलोकन करणे.

६) विद्यार्थ्यांची अध्ययन निष्पत्तीमधील प्रगती वाढविण्यासाठी, भौतिक आणि शैक्षणिक बाबींच्या पूर्ततेसाठी पालक ,स्वयंसेवक,स्वयंसेवी संस्था, सी.एस.आर. कंपन्या यांची मदत घेणे.

**ब) माहितीचे विश्लेषण करून निर्णय घेणे :-**

१. विद्यार्थ्यांची अध्ययन पातळी अधिकाधिक समृद्ध करण्यासाठी विद्यार्थीनिहाय ट्रॅकिंग यंत्रणा विकसित करण्याविषयी मार्गदर्शन करणे.

२. तालुकास्तरीय व शाळास्तरीय माहिती एकत्रित करून त्याचे विश्लेषण करणे.

३. विविध प्रकारच्या उपलब्ध माहितीवरून लक्ष्य क्षेत्र व प्राधान्यक्रम ठरवून जिल्हास्तरीय उपक्रम राबविणे.

४. माहितीचे विश्लेषण करुन गरजेनुरूप गुणवत्तावाढीसाठी नियोजन करणे.

**क) सनियंत्रण व पाठपुरावा करणे :-**

१. विविध प्रशिक्षण कार्यक्रमाचा आढावा घेऊन त्यांच्या परिणामांच्या मूल्यांकनाची रूपरेषा ठरविणे.
२. समूह साधन गट (सी.आर.सी.) व शाळा यांच्यामध्ये समन्वय साधून शैक्षणिक साहित्य वाटप आणि त्याची उपयोगिता याबाबत आढावा घेणे.
३. विविध शैक्षणिक योजनांची परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी आढावा घेऊन मार्गदर्शन करणे.
४. सी.आर.सी, बी.आर.सी./यु.आर.सी. मधील साधन व्यक्तीचे सक्षमीकरण होण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

**ड) उत्कृष्ट कार्याचे सामाईकीकरण करणे व संशोधन हाती घेणे :-**

१. राष्ट्रीय व राज्यस्तरावरील सैक्षणिक संशोधनाच्या निष्कर्षानुसार जिल्ह्यातील समस्या सोडवण्यासाठी उपाययोजना सुचविणे.
२. जिल्ह्यातील नवनवीन संकल्पना, तंत्रज्ञान, नाविन्यपूर्ण उपक्रम यांचा वापर करून अध्ययन अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना प्रेरणा देण्यासाठी उपक्रमांचे आयोजन करणे.

**इ) समता:-**

१. शाळा व्यवस्थापन समिती व पालक यांच्याशी समन्वय साधून शाळाबाहय विद्यार्थ्यांसह १०० टक्के विद्यार्थ्यांना दाखल करण्यासाठी उपस्थिती टिकवून गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे याबाबत आराखडा तयार करणे.
२. दिव्यांग विद्यार्थी १०० टक्के शाळेत दाखल करुन त्यांचे योग्यरित्या शिक्षण प्रक्रियेत समावेशन होण्यासाठी विविध संस्था व संबंधीत अधिकारी,कर्मचारी यांना निर्देश देणे.

**तालुकास्तरीय गुणवत्ता कक्षाची रचना ( Block Quality Cell ) :-**

| अ.क्र. | समिती सदस्य | पद |
|---|---|---|
| १ | गट विकास अधिकारी | अध्यक्ष |
| २ | अधिव्याख्याता/वरिष्ठअधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था | सदस्य **(संबंधित तालुक्याचा संपर्क अधिकारी)** |
| ३ | बाल विकास प्रकल्प अधिकारी पं.स. | सदस्य |
| ४ | विस्तार अधिकारी (शिक्षण) सर्व | सदस्य |
| ५ | विषय साधन व्यक्ती व समावेशित शिक्षण साधन व्यक्ती | सदस्य (२) |
| ६ | केंद्र प्रमुख | सदस्य (५) |

| | | |
|---|---|---|
| ७ | मुख्याध्यापक (प्राथ./माध्य./उच्च् माध्य.) | सदस्य (३) - **प्रत्येक १ वर्षांनंतर वेगवेगळया बीट मधील नवीन सदस्य घेणे.** |
| ८ | शिक्षक (प्राथ./माध्य./उच्च् माध्य.) | सदस्य (३) - प्रत्येक १ वर्षांनंतर वेगवेगळया बीट मधील नवीन सदस्य घेणे. |
| ९ | शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष | सदस्य (२)- प्रत्येक १ वर्षांनंतर नवीन शाळेतील सदस्य घेणे. |
| १० | गट शिक्षणाधिकारी | सदस्य-सचिव |

**तालुकास्तरीय गुणवत्ता कक्षाच्या ( Block Quality Cell ) जबाबदाऱ्या व कार्ये :-**

जिल्हास्तरीय कार्यक्रम समितीने घेतलेल्या निर्णयावर वेळेत नियोजन व कृती आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी करणे.

१. तालुकास्तरीय माहितीचे विश्लेषण करून अप्रगत केंद्र, विषयनिहाय व क्षमतानिहाय विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यावर उपाययोजना करणे.
२. शैक्षणिक व प्रशासकीय माहिती पाहून समस्यांचा शोध घेणे व त्यावर उपाययोजना सुचविणे,
३. केंद्रप्रमुखांच्या शाळा भेट, वर्ग भेट व संपूर्ण कामकाजाचे सनियंत्रण करून सहकार्य, करणे.
४. तालुकास्तरीय कार्यक्रमाची पुर्नविलोकन करून अनुधावन करणे,
५. तालुकास्तरीय गरजांचा/ समस्यांचा शोध घेऊन शिक्षकांना शैक्षणिक साहित्याची निर्मितीसाठी सहाय्य करणे ,
६. विस्तार अधिकारी,केंद्र प्रमुख व शिक्षक यांच्या सक्षमीकणासाठीचे उपक्रम ठरविणे.
७. प्रशिक्षणाची परिणामकारकता सहभागी शिक्षकांकडून व प्रत्यक्ष शाळा भेट करुन समजावून घेऊन मार्गदर्शन करणे.
८. प्रत्येक महिन्याच्या जिल्हास्तरीय गुणवत्ता कक्षाला तालुक्यातील समस्या, उत्कृष्ट कार्य सामाईकीकरण करणे.

**केंद्रस्तरीय गुणवत्ता कक्षाची ( Cluster Quality Cell ) पुनर्रचना:-**

| अ.क्र. | समिती सदस्य | पद |
|---|---|---|
| १ | केंद्र प्रमुख | अध्यक्ष |
| २ | विस्तार अधिकारी (शिक्षण) | निमंत्रित सदस्य |
| ३ | मुख्याध्यापक (प्राथ./माध्य./उच्च् माध्य.) | सदस्य (३) - **प्रत्येक १ वर्षांनंतर नवीन शाळेतील सदस्य घेणे.** |
| ४ | शिक्षक (प्राथ./माध्य./उच्च् माध्य.) | सदस्य (३) - **प्रत्येक १ वर्षांनंतर नवीन शाळेतील सदस्य घेणे.** |
| ५ | शाळा व्यवस्थापन समिती - अध्यक्ष | सदस्य (२)- **प्रत्येक १ वर्षांनंतर नवीन शाळेतील सदस्य घेणे.** |
| ६ | मुख्याध्यापक (केंद्रशाळा) | सदस्य-सचिव |

**केंद्रस्तरीय गुणवत्ता कक्षाच्या ( Cluster Quality Cell ) जबाबदाऱ्या व कार्ये:-**

१. तालुकास्तरीय गुणवत्ता कक्षाने घेतलेल्या निर्णयावर वेळेत नियोजन व कृती आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी करणे.
२. केंद्रस्तरीय माहितीचे विश्लेषण करुन अप्रगत शाळा, विषयनिहाय व क्षमतानिहाय विदयार्थ्यांचा शोध घेऊन त्यावर उपाय योजना करण्यासाठी मार्गदर्शन करणे.
३. शाळा, वर्ग व मूल भेट करुन मुख्याध्यापक व शिक्षक यांचे सक्षमीकरण करणे, प्रशिक्षणाची परिणामकारकता समजावून घेणे आणि शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी वेळेत नियोजन व कृती आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी करणे.
४. केंद्रस्तरीय गरजांचा/समस्यांचा शोध घेऊन शिक्षकांना शैक्षणिक साहित्याची निर्मितीसाठी सहाय्य करणे.
५. दरमहा केंद्रस्तरीय शिक्षण परिषदा आयोजन करुन त्यामध्ये केंद्रातील उत्कृष्ट कार्य केलेल्या शिक्षकांना मार्गदर्शन करण्याबाबत संधी उपलब्ध करुन देणे.

**राज्यस्तरीय कार्यक्रम सल्लागार समिती आणि जिल्हा,तालुका व केंद्रस्तरीय गुणवत्ता कक्षाची जबाबदारी व कालावधी:-**

| अ.क्र. | दिनांक | स्तर | बैठक प्रकार | जबाबदारी |
|---|---|---|---|---|
| १ | **प्रत्येक महिन्याच्या चौथ्या शुक्रवारी** | **राज्य** | जिल्हास्तरीय गुणवत्ता कक्षाच्या बैठकीचे इतिवृत्ताच्या आधारे त्याच महिन्यात संचालक यांनी आढावा घेणे. | संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र, पुणे |
| २ | **प्रत्येक महिन्याच्या १ ते ७ तारखेपर्यंत** | **जिल्हा** | जिल्हास्तरीय गुणवत्ता कक्षाची बैठक आयोजित करणे व त्याचे इतिवृत्त राज्यस्तरीय कार्यक्रम सल्लागार समिती तसेच, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांना पाठविणे. | प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था |
| ३ | **जिल्हास्तरीय गुणवत्ता कक्षाच्या बैठकीच्या सात दिवसानंतर** | **तालुका** | तालुकास्तरीय गुणवत्ता कक्ष बैठक आयोजित करणे व त्याचे इतिवृत्त जिल्हास्तरीय गुणवत्ता कक्षास व केंद्रस्तरीय गुणवत्ता कक्षास पाठविणे. | गट शिक्षणाधिकारी |
| ४ | **तालुकास्तरीय गुणवत्ता कक्षाच्या बैठकीच्या सात** | **केंद्र** | केंद्रस्तरीय गुणवत्ता कक्ष बैठक आयोजित करणे व त्याचे इतिवृत्त तालुका स्तरीय गुणवत्ता कक्षास पाठविणे. | केंद्रप्रमुख |

वरील सर्व राज्यस्तरीय कार्यक्रम सल्लागार समिती / जिल्हास्तरीय गुणवत्ता कक्ष / तालुकास्तरीय गुणवत्ता कक्ष / केंद्रस्तरीय गुणवत्ता कक्ष बैठकांसाठी येणारा खर्च समग्र शिक्षा अभियानांतर्गत येणा-या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०५१०१६४९१४४९२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

IMTIYAZ MUSHTAQUE KAZI

Digitally signed by IMTIYAZ MUSHTAQUE KAZI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT,
2.5.4.20=39a40419de755c2eab61fb555b2fdf8c8d6d652ff18fdffbd9c748ab01f6da04, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=77A529748C5E7C1BA7A66E81C654BA3C492FDA5B29E076241DB1BA213DDEDF4E, cn=IMTIYAZ MUSHTAQUE KAZI
Date: 2023.05.10 16:50:35 +05'30'

**(इ.मु. काझी)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
५. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई ,
८. सर्व विभागीय आयुक्त,
९. आयुक्त, सर्व महानगरपालिका,
१०.सर्व जिल्हाधिकारी,
११.आयुक्त ( शिक्षण ), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२.संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद , महाराष्ट्र ,पुणे,
१३.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,(जिल्हा परिषद)
१४. शिक्षण संचालक ( प्राथमिक ), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१५.शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च-माध्यमिक ), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र, राज्य, पुणे,
१६.शिक्षण संचालक ( योजना ), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१७.सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
१८. प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, ( सर्व )
१९.शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/योजना), जिल्हा परिषद ( सर्व ),
२०.शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील सर्व कार्यासाने,
२१.निवड नस्ती (कार्यासन-एसडी-६).